जिल्हा परिषदेमधील महिला शिक्षकांना दुर्गम व अतिदुर्गम भागामध्ये नियुक्ती न देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक :- आंजिब- ४६१७/प्र.क्र.५६७ /आस्था-१४

२५- मर्झबान पथ, बांधकाम भवन, फोर्ट,

मंबई-४०० ००१,

दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना-

राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांची नियुक्ती जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या शाळांवर केली जाते. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अशा शिक्षकांच्या वेळोवेळी बदल्या देखील केल्या जातात. मात्र, जिल्हा परिषदेंतर्गत असणाऱ्या काही शाळा दुर्गम व अतिदुर्गम भागात आहेत. काही शाळांच्या ठिकाणी पोहचण्यास पायी दोन दोन तास चालावे लागते. काही शाळांकडे जातांना जंगलातुन वा निर्जन ठिकाणावरुन जावे लागते. काही शाळा ज्या ठिकाणी आहेत तेथील स्थानिक परिस्थितीमुळे शिक्षकांना मुक्काम करणे देखील अडचणीचे होते. ही वस्तुस्थिती असली तरी अशा ठिकाणी पुरुष शिक्षकांबरोबर महिला शिक्षक देखील काम करीत आहेत. वास्तविक एवढया लांब पायी चालून वा जंगलातुन निर्जन ठिकाणावरुन चालणे महिला शिक्षकांसाठी अत्यंत अवघड आहे. या सर्व बाबी विचारात घेता जिल्हा परिषदे अंतर्गत महिला शिक्षकांसाठी स्थानिक परिस्थिती प्रतिकुल असलेल्या शाळांमध्ये दुर्गम अतिदुर्गम भागामध्ये तसेच जाण्या-येण्यासाठी गैरसोईच्या असलेल्या शाळांमध्ये महिला शिक्षकांसाठी नियुक्ती न देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

महिला शिक्षकांना अशा प्रतिकुल परिस्थितीमध्ये काम करावयास लागू नये म्हणुन शासन महिला शिक्षकांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

१) राज्यातील जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या ज्या शाळा अवघड क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आलेल्या आहेत व अशा शाळा ज्या अतिदुर्गम भागात आहेत आणि स्थानिक परिस्थितीमुळे महिला शिक्षकांना काम करण्यास प्रतिकुल अशा अवघड क्षेत्रातील शाळा महिला शिक्षकांसाठी काम करण्यास प्रतिकुल म्हणून घोषित करण्याची कार्यवाही सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी करावी.

२) अशा प्रकारे महिला शिक्षकांना काम करण्यास प्रतिकुल घोषित केलेल्या शाळामध्ये महिला शिक्षकांना प्रशासकीय बदलीने अथवा नियुक्तीने पदस्थापना देण्यात येऊ नये.

३) सध्या अशा जागी काही महिला शिक्षिका कार्यरत असल्यास त्यांनी मे. २०१८ च्या बदली प्रक्रियेत अर्ज करावेत. महिलांसाठी प्रतिकुल म्हणून घोषित केलेल्या शाळेवर सध्या कार्यरत असणाऱ्या महिला शिक्षकांना बदलीचा अधिकार प्राप्त होईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०९१०४०५७५०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyadarshan S Kamble

Digitally signed by Priyadarshan S Kamble
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f18890edb030995db4323c71a3bdecddde94daa5425bbe713b2e2a5b7d6fa779, cn=Priyadarshan S Kamble
Date: 2018.02.15 15:01:41 +05'30'

(प्रि.शं.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,मलबार हिल, मुंबई मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
५) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
६) सर्व अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
१०) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
११) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग.
१२) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२